**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चंद्रकला मधुकर भांड यांचा शपथेवर पुढील सरतपास त्यांचे वकील श्री.एन.के. नरसाळे यांचेमार्फत :**

५. मी या प्रकरणात निशाणी क्र.०५ वर माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही देखील आहे. तसेच मी या प्रकरणात निशाणी क्र.३ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहे.

आता मला दि.२०/०१/२०२५ रोजीचा मुळ धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून ती सही मी ओळखते. त्यास **नि.क्र.१८** देण्यात आला. सदरचा धनादेश आम्ही वटण्याकामी जिल्हा सहकारी बॅक, शाखा–सावेडी, अहमदनगर येथे जमा केला असता तो न वटता परत आला. त्याबाबतचा बॅकेचा दि.२४/०१/२०२५ रोजीचा मेमो मी या प्रकरणात दाखल केलेला आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येतो. सदरचा धनादेश न वटल्याकरणाने आम्ही आरोपीला आमच्या वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली होती. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येतो. तसेच सदरची नोटीस पाठविल्याबाबतची पोस्टाची पावती मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येतो. आरोपीला सदरची नोटीस मिळाल्याबाबतची ॲकनॉलेजमेंट रिसिट मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येतो.

६. मला हे प्रकरण दाखल करण्याबाबत व चालविण्याबाबतचे फिर्यादी पतसंस्था यांनी ठरावाव्दारे अधिकार दिले होते. सदरचा ठराव मी पटलावर वर्णनयादीसोबत दाखल केलेला आहे. आता मला दि.३०/०१/२०२५ रोजीचे ठरावाची सत्यप्रत दाखविण्यात आली. त्यावर आमच्या पतसंस्थेचे चेअरमन रानबा तुशाबा कजबे यांची सही आहे. ती मी ओळखते. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येतो.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.04 12:47:12 +0530

७. तसेच आता मला आरोपीने आमच्या पतसंस्थेत दि.३१/०५/२०२४ रोजी दाखल केलेला कर्ज मागणी अर्ज दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येतो. तसेच आरोपीला देण्यात आलेल्या कर्जाबाबतचा दि.२५/०६/२०२४ रोजीचा कर्जरोखा दाखल करण्यात आलेला आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येतो. तसेच आरोपीने आमच्या पतसंस्थेला दिलेली दि.२५/०६/२०२४ रोजीची वचनचिठ्ठी दाखल केलेली आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येतो. तसेच मी या प्रकरणात आरोपीने आमच्या पतसंस्थेत घेतलेल्या कर्जाबाबतचा खातेउतारा दाखल केलेला आहे व त्यासोबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब अंतर्गत प्रमाणपत्र देखील मी दाखल केलेला आहे. त्यास एकत्रितरित्या **नि.क्र.२७** देण्यात आला.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.ए.एस. खेडकर यांचे तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत म्हणजेच दि.०९/०३/२०२६ रोजीपर्यंत तहकुब.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे त्यांचे वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.04 12:47:20 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.०४/०३/२०२६**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.